I0-

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सातारा **P.S.**(ठाणे): फलटण शहर **Year** (वर्ष): 2020

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0204 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 17/06/2020 00:52 वाजे

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार **Date From** (दिनांक पासून): 16/06/2020

**Time Period** (कालावधी): पहर 5 **Date To** ( दिनांक पर्यंत): 16/06/2020

**Time From** (वेळेपासून): 14:00 वाजे

**Time To** (वेळेपर्यंत): 14:08 वाजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक): 17/06/2020 **Time** (वेळ): 00:15 वाजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 002 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 17/06/2020 00:46 वाजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 3 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): विद्युत [illegible] फलटण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): निशाल हणमं [illegible] पारे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card, Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड , मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.**(अ. क्र.) | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | 67/1लक्ष्मीनगर डीएडकलेज रोड,फलटण ,फलटण शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | 67/1लक्ष्मीनगर डीएडकलेज रोड,फलटण ,फलटण शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9921117799

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नांव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नंदकुमार भानुदास काळे | | | 1. हर्ली रामोनिता शही आपार्टम,फलटण शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

खबरी जबाब-दिनांक 17/06/2020मी विशाल हणमंतराव कणसे, वय 39 वर्ष, शिक्षण 12 वी नापास, व्यवसाय -इलेक्ट्रीक कन्ट्रक्टर, राहणार-67/1 लक्ष्मीनगर, डीएड कलेज रोड फलटण, ता. फलटण, जि. सातारा मोबाईल नंबर - 9921117799समक्ष हजर होवुन खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासमवेत राहणेस आहे. माझे वंश इलेक्ट्रीकल्स या नावाने माझी स्वतःची इलेक्ट्रीकल फर्म चालवित आहे. त्याचा परवाना क्रमांक 33058 असा आहे. मी फलटण शहर व आजुबाजुचे परिसरामध्ये इमारतींची तसेच बंगल्यांची नविन वीज मिटर, केबल बसविणेची कन्ट्रक्ट घेत असतो.मी माहे मार्च 2020 मध्ये श्रीराम नंदकुमार दाधमारे व दिलीप सोपानराव गायकवाड यांचेकडुन बिरदेवनगर, फलटण येथील साई संकल्प फेज 2 या इमारतीचे नविन वीज मिटर बसविणे व केबल बसविणेचे काम घेतलेले होते. दिनांक 09/03/2020 रोजी सदर इमारतीस 11 नविन वीज मिटर बसविणेसाठी विदयुत भवन कार्यालय फलटण येथे विहीत नमुन्यात अर्ज केलेला होता. दिनांक 31/03/2020 रोजी अभियंता काळे साहेब यांनी सदर इमारतीचे कामासाठी ऑर्डर मंजुर केली. त्यानंतर मी माझे कामाचे निमित्ताने विदयुत भवन कार्यालय फलटण येथे जात होतो त्यावेळी मला काळे साहेब भेटत असत त्यावेळी ते मला सांगत की, तुझे 11 मिटरचे काम केलेले आहे त्याची फर्म कोटेशन घेवुन जा आणी प्रत्येक मिटरचे 2000/- रुपये प्रमाणे 11 मीटरचे 22000/- रुपये घेवुन ये असे वारंवार सांगत असतात.त्यामुळे मी, घेतलेल्या इमारतीचे इलेक्ट्रीक कन्ट्रक्टमधील एकुण 11 नविन मीटरचे कोटेशन मला देण्यासाठी कार्यकारी अभियंता, विदयुत भवन फलटण ता.फलटण जि.सातारा येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री.काळे यांनी मला विदयुत भवन,फलटण येथे दि.16/06/2020 रोजी भेटायला बोलविले होते. तरी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री काळे हे मी घेतलेल्या इमारतीचे इलेक्ट्रीक कन्ट्रक्टमधील 11 नविन वीज मीटरचे कोटेशनचे काम मी त्यांना मी, पैसे दिल्याशिवाय करणार नाहीत, याची मला खात्री झाली. म्हणुन मी दिनांक 12/06/2020 रोजी न्टी करप्शन ब्युरो सातारा कार्यालयात पोलीस निरीक्षक, जगताप साहेबांशी संपर्क साधुन अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री काळे साहेब लाच मागणी करत असलेबाबत कळविले होते. त्यानुसार जगताप साहेबानी मला दिनांक 16/6/2020 रोजी फलटण शहराचे अलिकडे सातारा ते फलटण रोडवरील जिजाई मंगल कार्यालय येथे 11.00 वा. हजर राहणेबाबत सुचना दिल्या होत्या. दिनांक 16/06/2020 रोजी जगताप साहेबांनी माझ्याशी संपर्क साधुन मला त्यांचे वाहनाचे वर्णन सांगुन ते थांबले ठिकाणी येणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी जगताप साहेब थांबले ठिकाणी गेलो. त्यावेळी तेथे श्री.जगताप, पोलीस निरीक्षक, पंच व सापळा पथक हजर होते. श्री.जगताप साहेबांनी, माझी व विभागीय वनअधिकारी सामाजिक वनीकरण सातारा कार्यालयातील 1)अमर चंद्रकांत शिंदे, वनरक्षक 2) दत्तात्रय अंकुश कदम, वनरक्षक या दोन पचासह, सापळा पथकाची ओळख करुन दिली.त्यानंतर मी माझी वरील प्रमाणे तक्रार थोडक्यात कथन करुन माझा लेखी तक्रारी अर्ज जगताप साहेबांना दिला तो अर्ज जगताप साहेबांनी दोन्ही पंचाना वाचन करणेस दिला, त्याचे जगताप साहेब व दोन्ही पंचांनी अवलोकन केले. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे श्री.काळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. उपविभाग फलटण यांनी लाच मागणी केली

आहे अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरवून त्याकामी पंच नं 1 म्हणून श्री. अमर शिंदे व पंच नं 2 म्हणून श्री.दत्तात्रय कदम यांनी काम करण्याचे जगताप साहेब यांनी ठरविले. त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारी अर्जावर जगताप साहेब व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर जगताप साहेब यांनी मला व पंच नं.1 यांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डरसह माझ्याकडील चारचाकी वाहनाने पंच नं.1 यांना माझ्या सोबत अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री.काळे यांची भेट घेण्यासाठी पाठवून दिले. केले पडताळणी कारवाईमध्ये अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री.काळे यांची व माझी समक्ष भेट झाली. त्यावेळी माझेत व काळे यांचेमध्ये माझे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी काळे साहेबांनी मी घेतलेल्या इमारतीचे इलेक्ट्रीक कन्ट्रक्टमधील 11 नविन वीज मीटरचे कनेक्शन मला देण्यासाठी 22,000 /- रुपयाची लाच मागणी करुन तडजोडीअंती 20,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन, ती लाच रक्कम विद्युत भवन फलटण कार्यालयात स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची जगताप साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाल्याने जगताप साहेबांनी सापळा कारवाईचे आयोजन निश्चीत केले.त्यानंतर जगताप साहेब यांचे सुचनेनुसार मी 20,000/- रुपये एटीएममधुन काढुन हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन घेवुन त्या लाच रकमेस अँथ्रासिन पावडर लावण्याबाबतची कारवाई खाजगी वाहनामध्ये केली. सापळा कारवाई संबंधाने जगताप साहेब यांनी मला, दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्या चारचाकी वाहनामधुन अतिरिक्त कार्यकारी अभियंता, काळे यांची भेट घेण्याकामी फलटण शहराचे अलीकडे सातारा फलटण रोडवरील जिजाई मंगल कार्यालय फलटण येथुन रवाना केले. मी व पंच नं.1 असे आपले सुचनेप्रमाणे माझेकडील चारचाकी वाहनामधुन विद्युत भवन कार्यालय फलटण येथे गेलो. त्या ठिकाणी मी चारचाकी वाहन कार्यालयाचे पार्किंगमध्ये पार्क करुन विद्युत भवन इमारतीकडे निघालो असता माझ्या ओळखीचे एक इसम मला भेटले ते माझ्याशी चर्चा करु लागले. माझे बोलणे झाल्यानंतर मी व पंच नं.1 असे इमारतीमध्ये गेलो. त्यानंतर मला एक फोन आला त्यावर मी बोलत होतो. त्यानंतर मी व पंच नं.1 असे काळे साहेब यांचे कक्षाजवळ गेलो. त्यावेळी काळे साहेबांच्या कक्षामध्ये काही लोक बसले असल्याने मी व पंच नं.1 असे कक्षाचे बाहेरील बाजुस थांबुन राहिलो. त्यानंतर काळे साहेब यांच्या कक्षामधील लोक बाहेर आल्यानंतर काळे साहेबांनी मला आतमध्ये बोलावुन पंचास बाहेर थांबण्याबाबत हातानेच इशारा केला. त्यामुळे पंच हे काळे साहेबांचे कक्षाचे बाहेर थांबुन राहिले व मी साहेबांचे कक्षामध्ये गेलो. त्यानंतर काळे साहेबांनी मला त्यांच्यासमोरील खुर्चीवर बसण्याचा इशारा केला. त्यानंतर मी माझे नवीन कामासंदर्भाने चर्चा केली. त्यानंतर काळे साहेब हे कक्षाचे बाहेरील एका इसमास हं, हं, झाल का, आला का फोन तो नघासचा, आला का, एक पाच मिनिट बोलावतो, हे किती हायती, असे म्हणाले. त्यावर मी वीस हायती असे म्हणालो.त्यावर काळे साहेब बर,बर देवु आपण कोटेशन पास असेल ते असे म्हणाले. त्यावर मी हां कोटेशन सही आणि त्या फुलेंना सेवढ हे दयायला सांगा की, असे म्हणालो.त्यावर काळे बर,बर बर असे म्हणाले.त्यानंतर काळे साहेबांना कोणाचा तरी फोन आला ते फोनवर बोलत होते. त्यानंतर काळे साहेबांनी फुलेंना बोलवा बर, ही पैसे भरा बर का असे सांगितले. त्यानंतर मी ह,भरतो ना असे म्हणालो.त्यानंतर केबिनमध्ये तेथील लिपिक श्री. फुले हे कक्षात आले. त्यानंतर काळे साहेब काय होईल पेठ पेंडींगला नाव येल, मला तुम्हाला ते आल मिटर बसवता येईल व कोटेशन काढायला सांगु आम्ही असे म्हणाले. त्यावर मी ह असे म्हणालो. त्यानंतर काळे साहेब किती कनेक्शन हायती पाच हायत आणि कमर्शिअल दोन, थ्रिफेज एक असे म्हणाले. त्यावर मी कमर्शिअल आणि थ्रिफेज एक, असे म्हणालो. त्यानंतर काळे साहेब व श्री.फुले यांच्यामध्ये सदर कोटेशनवर जावक क्रमांक टाकुन देणेबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी ठिकय चालतय असे म्हणुन कक्षाचे बाहेर निघुन इमारतीचे मुख्य दरवाज्याजवळ आलो व लाच रक्कम स्विकारल्याबाबत पथकास इशारा केला. त्यानंतर आपण माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन घेवुन मला बाजुला थांबण्यास सांगितले. त्यानंतर पोनि जगताप यांनी मला पुन्हा श्री.काळे यांचे कक्षात बोलावुन घेवुन लाच रक्कमेबाबत विचारले असता मी, अभियंता काळे यांनी माझ्याकडे लाच मागणी केली. त्यावेळी पंच नं 1 हे कक्षाचे बाहेर होते. मी सदरची लाच रक्कम माझे शर्टचे वरील बाजुचे डावे खिशातुन उजवे हाताने काढुन काळे साहेब यांचेसमोर धरली असता काळे साहेब यांनी ती लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पँटचे पुढील बाजुचे उजवे खिशात ठेवली असल्याचे सांगितले.त्यानंतर तेथेच उभे असलेले पंच नं 1 यांना जगताप साहेबांनी लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता त्यांनी माझे वरील प्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर जगताप साहेबांनी अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचे कक्षामधील दार खिडकी व लाईट बंद करुन कृत्रिम अंधार करुन माझे हाताची व अंगावरील कपड्यांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या दोन्ही हाताचे बोटांचे पेऱ्यावर तसेच तळहातास अँथ्रासिन पावडर लागलेची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली नंतर कक्षामध्ये उजेड केला.त्यानंतर जगताप साहेब यांनी अतिरिक्त कार्यकारी अभियंता काळे यांना ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री.नंदकुमार भानुदास काळे, वय 40 वर्षे अतिरिक्त कार्यकारी अभियंता वर्ग - 1 कार्यकारी अभियंता, म.रा.वि. वि.उपविभाग फलटण ता.फलटण जि.सातारा मुळ रा. कण्हेर ता.माळशिरस जि.सोलापुर सध्या रा.मोनिता सृष्टी अपार्टमेंट, फ्लट नं.7 डीएड चौक, फलटण ता.फलटण जि.सातारा असे सांगितले. त्यानंतर श्री. काळे यांच्यासह जगताप साहेब व दोन्ही पंच तसेच सापळा पथक असे खाजगी वाहनाने व मी माझेकडील वाहनाने शासकीय विश्रामगृह फलटण येथील कक्ष क्र.1 मध्ये आलो. त्यानंतर मला कक्षाचे बाहेर थांबण्यास सांगितले. काहीवेळाने मला कक्षामध्ये बोलावुन घेवुन दोन्ही पंचांनी माझी ओळखपत्रांची घेतली. त्यानंतर जगताप साहेबांनी, माझे व पंच नं. 1 यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट नवील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कक्षाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा मला कक्षामध्ये बोलावुन घेवुन मला घडलेली हकिकत विचारली. तरी दिनांक 16/06/2020 रोजीचे पडताळणी व सापळा कारवाईमध्ये श्री.नंदकुमार भानुदास काळे, वय 40 वर्षे अतिरिक्त कार्यकारी अभियंता वर्ग - 1 यांनी मी घेतलेल्या इमारतीचे इलेक्ट्रीक कन्ट्रक्टमधील 11 नविन वीज मीटरचे कोटेशन देण्यासाठी 22,000/- रुपयांची लाच मागणी करुन तडजोडीअंती 20,000/- रुपये लाच रक्कम विद्युत भवन, फलटण येथील अर्बन विभागातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचे कक्षात दि.16/06/2020 रोजी 14.08 वाजण्याचे सुमारास माझ्याकडुन स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द तक्रार आहे.समोर ही खबर दिली

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): SANDIP ANKUSH BANKAR

**Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): 12201000359SAB **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): PRATAP Dhondiram POMAN

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN60854

पोलीस ठाणे अंमलदार
फलटण पोलीस स्टेशन